महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४००००१, दू.०२२-२२६२०२३१/३२,
Website-www.doa.maharashtra.gov.in Email ID: directorateofart@gmail.com

---

संदर्भ:-शासन निर्णय क्र.एडीआर-२०२५/प्र.क्र.५०/तांशि-६, दि.०६.०६.२०२५

## प्रसिध्दीपत्रक

### शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र/पदविका अभ्यासक्रम प्रवेशासाठीचे सुधारित वेळापत्रक

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता १वर्ष, २ वर्षे व ३ वर्षे कालावधीच्या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम शासकीय, शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे या प्रक्रियेच्या माहितीसाठी सूचना दि.०६. जून. २०२५रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम दिनांक २० जून, २०२५ अशी आहे. तथापि, काही विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत वाढविण्याबाबत विचारणा होत आहे. सबब, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता १वर्ष, २ वर्षे व ३ वर्षे कालावधीच्या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष पदविका/प्रमाणपत्र कला विषयक अभ्यासक्रम प्रवेशासाठी उमेदवारांनी खालील वेळापत्रकानुसार http://doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रवेश (Admission) या विंडोवर"पदविका अभ्यासक्रम प्रवेश २०२५-२६" या पर्यायावर किंवा https://doaonline.co.in/DIP25/ या लिंकवर खालील वेळापत्रकानुसार ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

प्रवेश प्रक्रियेचे टप्पे आणि नियोजित तारखा :-

| अ.क्र. | प्रक्रिया | वेळापत्रक | |
|---|---|---|---|
| | | पहिली दिनांक | सुधारित अंतिम दिनांक |
| १ | १)मुलभूत अभ्यासक्रम(Foundation Certificate in Art & Design), २)कला शिक्षक पदविका ३)आर्ट मास्टर(सुट्टीतील/अंशकालीन), ४)रेखा व रंगकला, ५)उपयोजित कला, ६)शिल्पकला व प्रतिमानबंध, ७)अंतर्गत गृहसजावट, ८)वस्त्रकाम (टेक्सटाईल), ९)मातकाम (सिरॅमिक व पॉटरी), १०)कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड) या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवाराद्वारे संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे, महाविद्यालय व अभ्यासक्रम निवडणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायांप्रती अपलोड करणे | ०७/०६/२०२५ | ०५/०७/२०२५ |
| २ | उमेदवारांसाठी पहिली तात्पुरती निवड यादी प्रदर्शित करणे, | ०८/०७/२०२५ | |
| ३ | सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी तात्पुरत्या निवड यादीबाबत काही तक्रार असल्यास त्यांनी त्यांच्या लॉगीनमध्ये "Grirvances"या पर्यायावर तक्रार सादर करणे. | ०९/०७/२०२५ | |
| ३ | उमेदवारांसाठी पहिली निवड यादी प्रसिध्द करणे | १४/०७/२०२५ | |
| ४ | संबंधीत महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा दिनांक | १५/०७/२०२५ | १८/०७/२०२५ |

(टिप:-वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत http://doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर घोषित करण्यात येईल.)

सही/-)
(स्मिता किंकळे)
प्र. निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सही/-
(विनोद दांडगे)
कला उपसंचालक(प्रशा.), कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्राचार्य
जे. के. ॲकॅडमी ऑफ आर्ट ॲंड डिझाईन
वहाळ (पू), मुंबई-१७.

Scanned with OKEN Scanner